**किरकोळ दिवाणी अपील नं. ५७/२०२१**
श्रीकांत पाटील वि. सुभाष कणसे

**निशाणी ५२, ५४ व ५६ वरील आदेश** :

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुतचे अपील अर्जदार यांनी रे.दि.मु. नं. ३३/२०२१ चे कामी दिनांक ०८/१०/२०२१ रोजी निशाणी ६ चे तुर्तातुर्त ताकिद अर्जावर झालेल्या निर्णयाविरुध्द दाखल केलेले आहे. प्रस्तूत प्रकरणातील जाबदार नं. ३ भिमराव बाबुराव शिंदे हे दिनांक १७/१२/२०२२ रोजी, जाबदार क्र. ७ सुभाष पांडुरंग पाटील हे दिनांक १८/०७/२०२२ रोजी तसेच जाबदार नं. ९ सज्ञाका भिमराव माळी या दिनांक ०७/०८/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. प्रस्तुत जाबदारांचे वारस वेळेत अभिलेखावर न घेतल्याने त्यांच्या विरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. त्यामुळे जाबदार क्र. ३, ७, व ९ विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द होऊन त्यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांचे अर्जात नमुद केले प्रमाणे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचे अर्ज केले आहेत. प्रस्तावीत वारसांना प्रस्तुत अर्जाच्या नोटीसीची बजावणी होऊनही जाबदार व प्रस्तावीत वारसांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता, प्रकरणाचे काम सुरु असताना यातील जाबदार क्र. ३, ७, व ९ हे अनुक्रमे १७/१२/२०२२, १८/०७/२०२२ व ०७/०८/२०२२ रोजी मयत झाल्याचे दाखल कागदपत्रांवरुन दिसुन येते. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस असलेबाबतचे कथन अर्जदाराने शपथेवर केलेले आहे. प्रकरणाचे स्वरुप पहाता त्यामध्ये अर्जदार व जाबदारांचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत अर्जदारांचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय वाद विषयाचे

समुळ निराकरण होणार नाही. त्यामुळे मयताचे वारस पटलावर घेण्यास झालेला उशीर माफ करणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज निशाणी ५२, ५४ व ५६ मंजूर करण्यात येत आहेत.

२. जाबदार क्र. ३, ७, व ९ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. अर्जात नमुद केलेप्रमाणे अर्जदार यांनी या आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाच्या आंत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन जाबदारांना देखील पुरवावी.

४. खर्चाबाबत आदेश नाहीत.

ANIRUDDHA SUBHASH GANDHI

Digitally signed by ANIRUDDHA SUBHASH GANDHI
Date: 2024.06.22 16:14:24 +0530

(अनिरुध्द सुलभा सुभाष गांधी)

दिनांकः– २१/०६/२०२४ जिल्हा न्यायाधीश –१, इस्लामपूर.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | Shri. Pradip Mangal Tanajirao Patil (Grade-I) |
| Court Name | : | District Judge – 1, Islampur. |
| Date of Judgment/order | : | 21/06/2024 |
| Signed by P.O. on | : | 21/06/2024 |
| Uploaded on | : | 21/06/2024 |